**ठळक बातम्या**

- दोन दिवसांच्या सौदी अरेबिया दौऱ्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या मंगळवारी जेद्दाहला पोहोचणार

- इस्टरनिमित्तानं जाहीर केलेल्या युद्ध विरामाचं उल्लंघन केल्याचे रशिया आणि युक्रेन यांचे आरोप-प्रत्यारोप

- कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर', 'खालिद का शिवाजी' आणि जुनं फर्निचर या चार मराठी चित्रपटांची निवड

- जॉर्डन इथं आज सुरू झालेल्या १५ आणि १७ वर्षांखालच्या आशियाई बॉक्सिंग चॅम्पियनशीप स्पर्धेत भारताची विजयी सलामी

**आणि**

- आयपीएलमधे मोहाली इथं झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा पंजाब किंग्जवर ७ गडी राखून विजय, तर मुंबईत मुंबई इंडीयन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांची लढत सुरु

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्याअंतर्गत येत्या मंगळवारी ते जेद्दाह इथं पोहोचतील. गेल्या ४० वर्षांमध्ये जेद्दाह या सौदी अरेबियाच्या व्यावसायिक केंद्राला भारताच्या प्रधानमंत्र्यांनी दिलेली पहिली भेट असेल.

भारत सौदी अरेबियासोबतची धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांची जेद्दाह भेट महत्वाची असल्याचं भारताचे सौदी अरेबियातील भारतीय राजदूत सुहेल अजाज खान यांनी

म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या या दौऱ्यात दोन्ही देशांमधली संरक्षण भागीदारी, ऊर्जा सहकार्य आणि प्रादेशिक तसंच जागतिक राजकीय परिस्थितीशी संबंधित मुद्यांवर चर्चा होण्याची शक्यता असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या दौऱ्यात दोन्ही देशांमध्ये अनेक नवे करार होण्याची शक्यता असून, त्यामुळे दोन देशांमधली धोरणात्मक भागीदारीही अधिक मजबूत होईल असंही भारताच्या राजदुतांनी म्हटलं आहे.

<><><><><>

ईस्टर म्हणजेच प्रभू येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाचा दिवस आज सर्वत्र भक्तीभावात साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी यानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. ईस्टरनिमित्त ठिकठिकाणच्या चर्चमधून विशेष प्रार्थनेसह अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं.

<><><><><>

इस्टरनिमित्तानं जाहीर केलेल्या ३० तासांच्या युद्ध विरामाचं उल्लंघन युक्रेननं केल्याचा आरोप रशियाच्या संरक्षण विभागानं केला. तर रशियानं एकर्फी जाहीर केलेल्या युद्धविरामानंतरही सातत्यानं हल्ले सुरूच ठेवल्याचा आरोप युक्रेननं केला. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी हा युद्धविराम ३० दिवसांपर्यंत वाढवावा अशी मागणी केली आहे.

युक्रेन आणि रशियात संघर्ष सुरू असतानाच आज इस्टरच्या दिवशी दोघांनी एकमेकांच्या ताब्यातल्या २४६ युद्धकैद्यांचं हस्तांतर केलं.

<><><><><>

भारताच्या भेटीवर असलेले भूतान नरेश जिग्मे खेसर नामग्येल वांगचुक यांनी आज आसामला भेट दिली. या भेटीत त्यांनी जोगिघोपा इथल्या अंतर्देशीय जलमार्ग

तळ आणि मल्टी मॉडेल लॉजिस्टिक्स पार्कातील सोयी सुविधांची पाहणी करून, त्याविषयी माहिती घेतली.

<><><><><>

फ्रान्समधे होणाऱ्या कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी  'स्थळ', 'स्नो फ्लॉवर','खालिद का शिवाजी' आणि जुनं फर्निचर या  चार मराठी चित्रपटांची निवड झाली आहे. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळानं आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी ही माहिती दिली.

फ्रान्समध्ये येत्या १४ ते २२ मे २०२५ या कालावधीत कान चित्रपट महोत्सव होत आहे.

<><><><><>

गेल्या चार वर्षात भारताचा परकीय चलन विनिमय बाजार दुपटीनं वाढल्याचं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं. बाली इथं एका परिषदेला ते आज संबोधित करत होते. भारताची वित्तीय बाजारपेठ एक गतीमान शक्ती म्हणून उदयाला आल्याचं मल्होत्रा यावेळी म्हणाले.

२०२० ला परकीय चलन विनिमय बाजार ३२ अब्ज डॉलर होता, तो २०२४ ला ६० अब्ज डॉलर इतका वाढला. दैनंदिन  गुंतवणूक तीन लाख कोटींवरून साडे पाच लाख कोटींपर्यंत वाढली. या कालावधीत सरकारी रोखे बाजारातली दैनंदिन गुंतवणूक ४० टक्क्यानं वाढली, असंही मल्होत्रा यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय पोषण पंधरवड्यानिमित्त वाशिम जिल्ह्यात विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. प्रकल्प अधिकारी  संजय धनराज गणवीर यांनी  याविषयी दिलेली माहिती आता आपण ऐकूया..

**होल्ड - बाइट - संजय धनराज गणवीर**

यातल्या लाभार्थी नेहा प्रफुल्ल झाटे यांनी सांगितलं..

**होल्ड - बाइट - नेहा प्रफुल्ल झाटे**

**<><><><><><>**

जॉर्डन इथं आजपासून सुरू झालेल्या १५ आणि १७ वर्षांखालच्या आशियाई बॉक्सिंग चॅम्पियनशीप स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारतानं दोन विजय मिळवले. हार्दिक दहिया आणि रुद्राक्ष सिंग यांनी प्राथमिक फेरीत विजय मिळवत भारताची दमदार सुरुवात केली.  या स्पर्धेत भारताचे ५६ मुष्टीयोद्धे सहभागी झाले आहेत. यात १५ वर्षांखालच्या ३०, आणि १७ वर्षांखालच्या २६ खेळाडूंचा समावेश आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मोहाली इथं झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं पंजाब किंग्जवर ७ गडी राखून विजय मिळवला.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्जनं निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून १५७ धावा केल्या. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं ३ गड्यांच्या मोबदल्यात सामन्यातले ७ चेंडू बाकी असताना ही धावसंख्या पार केली. देवदत्त पडिक्कलच्या ३५ चेंडूत ६१, आणि विराट कोहलीच्या नाबाद ७३ धावांच्या खेळीमुळे हा विजय सोपा झाला.

या स्पर्धेतला  आजचा दुसरा सामना मुंबईतल्या वानखेडे स्टेडिअमवर, मुंबई इंडीयन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सुरु आहे. मुंबई इंडीयन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.शेवटची बातमी हाती आली तेव्हा चेन्नई सुपर किंग्जच्या ८ षटकात ३ बाद ६३ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीरच्या रामबन जिल्ह्यात सेरी बागन इथं झालेल्या मुसळधार पावसानंतर भूस्खलन झालं असून त्यात तिघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन लहान मुलांचा समावेश असून १०० नागरिकांची सुटका करण्यात आली. भूस्खलनानंतर या भागातील अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवले आहेत.

<><><><><>

लडाखमध्ये कालपासून जोरदार हिमवृष्टी आणि गारपीट होत असून अनेक ठिकाणचं जनजीवन विस्कळीत झालं आहे. पुढचे काही दिवस हिमवादळाची शक्यताही हवामान खात्यानं वर्तवली असून सर्व यंत्रणांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत.

<><><><><>

भारतीय हवाई दलाचा एक ताफा संयुक्त अरब अमिरातीतील अल धाफ्रा एअर बेस येथे ‘डेजर्ट फ्लॅग-10’ या युद्धसरावात सहभागी होण्यासाठी पोहोचला आहे. हा युद्धसराव संयुक्त अरब अमिरात हवाई दलाच्या वतीने आयोजित करण्यात आला असून, यात भारतासोबतच ऑस्ट्रेलिया, बहरीन, फ्रान्स, जर्मनी, कतार, सौदी अरेबिया, दक्षिण कोरिया, तुर्की, संयुक्त अरब अमिरात, ब्रिटन, आणि अमेरिका, या देशांच्या हवाई दलांचे ताफे सहभागी होत आहेत.

हा सराव उद्यापासून सुरू होणार असून, 8 मे पर्यंत चालणार आहे.

<><><><><>

"वक्फ सुधारणा कायदा भाजपने समाजात फूट पाडण्यासाठी आणला आहे" असा आरोप कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज केला. बक्सरमधे आयोजित जाहीर सभेत ते बालत होते. नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालचं जेडीयू आणि भाजपचं आघाडी सरकार हे संधीसाधू गठबंधन आहे, अशी टीकी त्यांनी केली.

**<><><><><><>**

विश्व मराठी साहित्य संमेलनात दिल्या जाणाऱ्या साहित्यभूषण पुरस्काराची रक्कम या वर्षीपासून १० लाख रुपये केली जाणार असल्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज केली. त्यांच्या उपस्थितीत रत्नागिरी तालुक्यातलं मालगुंड, हे पुस्तकांचं गाव म्हणून घोषित करण्यात आलं. या लोकार्पण सोहळ्यात तो बोलत होते. मालगुंडच्या कवी केशवसुत स्मारकाच्या नूतनीकरणासाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणाही त्यांनी केली. कोकणातल्या साहित्यिकांची माहिती देणाऱ्या कोकणसाहित्य सन्मान दालनाचं उद्घाटनही या वेळी झालं.

**<><><><><><>**

नागपूर इथं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत महिलांना पिंक ई-रिक्षा वितरण करण्यात आलं. भविष्यात दोन हजार महिलांना ई रिक्षांचं वितरण करत त्यांना रोजगार मिळवून देण्याचा उद्देष्ट्य असल्याचं मुख्यमंत्री फडनवीस यांनी यावेळी सांगितलं.

**//<><><><><><>//**